तरुणाई अडकतेय व्यसनांच्या जाळ्यात

व्यसनाधीनतेत 20 टक्क्यांनी वाढ 18 ते 30 वयोगटातील सर्वाधिक रुग्ण

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

मुंबईतील तरुणाई व्यसनांच्या जाळ्यात अडकली असून याबाबत मानसोपचारतज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. यामध्ये १८ ते ३० या वयोगटातील तरुणांचा सहभाग सर्वाधिक असल्याने मानसोपचारतज्ज्ञांनी भीती व्यक्त केली आहे. मुंबई महापालिकेच्या वतीने परळ येथील केईएम रुग्णालयातर्फे चालवण्यात येणाऱ्या व्यसनमुक्ती केंद्रात यंदा पहिल्या पाच महिन्यांत नवीन रुग्णांमध्ये १५ ते २० टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे.

यावर्षी जानेवारी ते मे पर्यंतच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, या वयोगटातील ७५ तरुण रुग्णांवर सध्या उपचार सुरू आहेत, ही केंद्रातील सर्वांत मोठी संख्या आहे, तसेच ३१ ते ३५ वर्षे वयोगटातील ४७ रुग्ण, १८ वर्षांखालील नऊ आणि ४६ ते ६० वर्षे वयोगटातील सात रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

रुग्णालय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार रुग्णालयातील डॉक्टर शाळांमध्ये जाऊन तिथेही समुपदेशन करत आहेत. यासोबतच पालक आणि विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या व्यसनाचे घातक परिणाम आणि उपलब्ध सेवांबाबत जागरूक केले जात आहे.

केईएम रुग्णालयातील मानसोपचार विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. शिल्पा आडारकर यांच्या मते, शालेय आणि महाविद्यालयीन मुले व तरुण प्रौढांमध्ये अमली पदार्थांचे व्यसन ही चिंताजनक बाब आहे. गेल्या ३० वर्षांपासून केंद्रात कार्यरत असलेल्या आडारकर म्हणाल्या की, यापूर्वी गांजा, झोपेच्या गोळ्या, तंबाखू, कफ सिरप, ब्राऊन शुगर, नेलपॉलिश किंवा चिकट पदार्थ आणि अल्कोहोलचे व्यसन यांच्याशी संबंधित बहुतेक व्यसने

आम्ही पाहिली आहेत, पण आता त्यांना एमडी ड्रग्ज आणि गांजाचे व्यसन लागलेली मुलेही दिसत आहेत. केईएम रुग्णालयात येणारे रुग्ण हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतात. गरीब मुलांमध्ये एमडीसारख्या उच्च किमतीच्या व्यसनयुक्त पदार्थांचा वाढता ओढा, हा चिंतेचा विषय आहे, असे डॉ. आडारकर म्हणाल्या.

मुंबईतील एकमेव केईएम रुग्णालयात व्यसनमुक्ती ओपीडी युनिट आहे. गेल्या वर्षी सेवांचा विस्तार केल्यानंतर आणखी ४५ खाटांची भर पडली आहे. व्यसनमुक्ती केंद्राच्या ओपीडीमध्ये दरवर्षी सरासरी एक हजार ते १२०० नवीन रुग्ण येतात, तर हजारो रुग्ण फॉलोअपसाठी येत असल्याची नोंद आहे. गेल्या वर्षी ६८० रुग्णांनी दारूच्या व्यसनासाठी उपचार घेतले आणि २७० रुग्णांनी ब्राऊन शुगर, गांजा यासारख्या इतर पदार्थांवर अवलंबून न राहण्यासाठी उपचार घेतले. अल्कोहोल व्यसन सर्वांत व्यापक आहे, अंदाजे ७० टक्के रुग्णांना प्रभावित करते. अमली पदार्थांच्या सेवनाला प्रोत्साहन देणाऱ्या जाहिराती आणि चित्रपटांचा तरुणांवर मोठा प्रभाव पडतो, असे डॉ. आडारकर म्हणाल्या.

मानसोपचार विभागाच्या प्रमुख डॉ. अजिता नायक यांनी सांगितले की, केईएमचे डॉक्टर व्यसनमुक्तीसाठी जाहिरातींमध्ये अप्रमाणित घरगुती उपचारांच्या जोखमींबद्दल चेतावणी देतात. रुग्णांना आणखी हानी पोहोचवू शकतील, अशा पद्धती वापरण्यापासून कुटुंबांना माहिती देतात. कुटुंबांना प्रशिक्षित मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन केले जाते.

शेवटच्या दिवशी अर्ज माघारी घेतलेल्या उमेदवारांची यादी

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तर 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी पार पडणार आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. यावेळी राज्यातील अनेक बंडखोर उमेदवारांना समजवण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आले आहे.

आज कोणी कोणी उमेदवारी अर्ज मागे घेतले?

गोपाळ शेट्टी- भाजप, बोरीवली
स्विकृती शर्मा- शिवसेना शिंदे गट, अंधेरी पूर्व
नाना काटे- अजित पवार, चिंचवड
बाबुराव माने- शिवसेना ठाकरे गट, धारावी
मधू चव्हाण- काँग्रेस, भायखळा
विश्वजीत गायकवाड, भाजप, लातूर
विजयराज शिंदे- भाजप, बुलढाणा
किशोर समुद्रे- भाजप, मध्य नागपूर
जयदत्त क्षीरसागर- अपक्ष बीड
जगदीश धोडी- शिवसेना शिंदे गट, बोईसर
अशोक भोईर- बहुजन विकास आघाडी, पालघर
अमित घोडा- भाजप, पालघर
तानाजी वनवे- काँग्रेस, नागपूर पूर्व
तनुजा घोलप- अपक्ष, देवळाली
सुहास नाईक-काँग्रेस, शहादा तळोदा
विश्वनाथ वळवी- काँग्रेस, नंदुरबार
मदन भरगड- काँग्रेस, अकोला
प्रशांत लोखंडे- शिवसेना शिंदे गट, श्रीरामपूर
उदय बने- शिवसेना ठाकरे गट, रत्नागिरी
अंकुश पवार- मनसे, नाशिक मध्य
सुजित झावरे पाटील- अजित पवार गट, पारनेर
जिशान हुसेन- वंचित बहुजन आघाडी, अकोला
राजेभाऊ फड-अजित पवार गट, परळी
मधुरिमाराजे- काँग्रेस, कोल्हापूर उत्तर विधानसभा
सुरज सोळुंके- शिवसेना शिंदे गट, उस्मानाबाद
मकरंदराजे निंबाळकर- शिवसेना ठाकरे गट, उस्मानाबाद
कुणाल दराडे- शिवसेना ठाकरे गट, येवला
जयदत्त होळकर- शरद पवार गट, येवला
संदीप बाजोरिया- शरद पवार गट, यवतमाळ
हेमलता पाटील- काँग्रेस, नाशिक मध्य
दिलीप माने- काँग्रेस, सोलापूर
धनराज महाले- शिवसेना शिंदे गट, दिंडोरी
शिवाजी उर्फ पप्पू डोंगरे- भाजप, सांगली
किरण ठाकरे- भाजप, कर्जत खालापूर
प्रतिभा पाचपुते- भाजप, श्रीगोंदा
रणजीत पाटील- शिवसेना ठाकरे गट- परंडा
नरेश अरसडे- अजित पवार गट- काटोल
सुबोध मोहीते- अजित पवार गट- काटोल
राजश्री जिचकार- काँग्रेस- काटोल
वृषभ वानखेडे- आम आदमी पार्टी- काटोल
संदीप सरोदे- भाजप- कोटोल
अविनाश राणे- शिवसेना शिंदे गट- अणुशक्तीनगर
संगिता ठोंबरे- भाजप, केज
राजू परावे- शिवसेना शिंदे गट- उमरेड
अब्दूल शेख- अजित पवार गट- नेवासा

अणुशक्ती नगर आणि दिंडोरीतील शिवसेना-शिंदे गटातील उमेदवारांनी माघार घेतली

भिवंडी पूर्व - शिवसेना उबाठा गटाचे माजी आमदार रुपेश म्हात्रेंची माघार

मुलुंड - राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार संगीता वाझे यांची माघार

कुर्ला - शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार मिलिंद कांबळे यांची माघार

रत्नागिरी - काँग्रेसचे बंडखोर उमेदवार अविनाश लाड यांची माघार

विधानसभा निवडणुकीनंतर मुंबईकरांचे पाणी महागणार

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे गेल्या दोन वर्षांपासून पाणीपट्टी वाढ सरकारने रोखून धरली होती. मात्र आता विधानसभा निवडणुकीनंतर मुंबईचे पाणी महागणार आहे. सुमारे ८ टक्केपर्यंत ही पाणीपट्टी वाढण्याची शक्यता असून याची अंमलबजावणी तातडीने करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. पाणीपट्टीत वाढ झाल्यानंतर घरगुती व व्यावसायिक पाणीपट्टीत किमान प्रति एक हजार लिटर मागे ५५ पैसे ते ६ रुपये पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय नियमानुसार ७० टक्के मलनिःसारण शुल्क स्वतंत्र द्यावा लागणार आहे. जल अभियंता खात्याचा आस्थापना खर्च (कर्मचाऱ्यांचा पगार व अन्य भत्ते), प्रशासकीय खर्च, प्रचालन व परिरक्षण खर्च, विद्युत खर्च व शासनाच्या भातसा व अप्पर वैतरणा धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी यांच्या एकत्रिक खर्चाचा आढावा घेतला असता खर्च वाढलेला दिसून आला. त्यामुळे गेल्या वर्षभरापासून मुंबई महापालिका पाणीपट्टी वाढ करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागत आहे. परंतु निवडणुका लक्षात घेऊन, राज्य सरकारने पाणीपट्टी वाढीस महापालिकेला परवानगी दिली नाही. त्यामुळे पालिकेला किमान ३०० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागले आहे. प्रतिवर्षी ८ टक्केपर्यंत पाणीपट्टीत वाढ करण्याचा अधिकार स्थायी समितीने पालिका प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे दरवर्षी १६ जूनपासून पाणीपट्टीत वाढ करण्यात येते. मात्र गेल्या दोन वर्षापासून राजकीय हस्तक्षेपामुळे रखडलेली पाणीपट्टी वाढ विधानसभा निवडणुकीनंतर करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे.

लंडनमधील मैत्रिणीकडून वयोवृद्धाची लाखोंची फसवणूक

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

लंडनमध्ये राहणाऱ्या महिलेबरोबर मैत्री करणे ८३ वर्षीय व्यक्तीला भलतेच महागात पडले आहे. महिलेने परदेशी चलनासह आंतरराष्ट्रीय विमानतळावर पकडल्याची बतावणी करून तक्रारदाराला विविध खात्यात रक्कम जमा करण्यास भाग पाडले. याप्रकरणी दोन अज्ञात महिलांविरोधात गोवंडी पोलिसांनी फसवणूकीसह माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे. या प्रकरणामागे सायबर फसवणूक करणाऱ्या सराईत टोळीचा सहभाग असल्याचा संशय आहे.

८३ वर्षांचे तक्रारदार गोवंडीतील देवनार परिसरात राहत असून ते व्यवसायाने वकील आहेत. त्यांचा एक मुलगा आणि मुलगी परदेशात वास्तव्यास आहे, तर दुसरा मुलगा त्याच्या कुटुंबियांसोबत गोरेगाव येथे राहतो. ८ ऑक्टोबरला ते त्यांच्या घरी होते, यावेळी त्यांना अमेलिया फ्लोरिडा नावाच्या एका अज्ञात महिलेचा संदेश आला होता. तिने त्यांच्याशी मैत्री करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांनी तिला होकार दर्शविला होता. चर्चेदरम्यान तिने त्यांना ती लंडन येथे राहत असून तिचा बांधकामाशी संबंधित व्यवसाय असल्याचे सांगितले. तिचा आई-वडिलांचा हा व्यवसाय असून सध्या ती त्यांचा व्यवसाय सांभाळते असे सांगितले होते. तिच्या एका नातेवाईकाचा स्वीडन येथे सोन्याचा व्यवसाय आहे. त्यासाठी तिला एका नामांकित कंपनीचे सराफ हवे आहेत, ती लवकरच भारतात येणार असल्याचे सांगून याकामी त्यांनी तिला मदत करण्याची विनंती केली होती.

पोलिसांच्या मेहनतीची सरकारलाच किंमत नाही

विशेष सुरक्षा तर पुरवली, पण त्याचे 7 कोटी मात्र थकित!

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

अनेक व्हीआयपी व्यक्ती, संस्था, महत्त्वाच्या कारवाया, सरकारी कार्यक्रमांचा बंदोबस्त अशा वेगवेगळ्या गोष्टींसाठी मुंबई पोलिसांकडून विशेष सुरक्षेची मागणी केली जाते. शहराची सुरक्षा व कायदा-सुव्यवस्थेची सर्वात महत्त्वाची जबाबदारी असूनही मुंबई पोलीस प्रचंड ताण सहन करून ही सुरक्षा पुरवतात देखील. मात्र, खुद्द सरकारकडूनच मुंबई पोलीस विभागाच्या मेहनतीचा परतावा मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. माहिती अधिकार अर्जाद्वारे यासंदर्भातला खुलासा झाला आहे.

राज्य सरकारच्या विविध विभागांकडून वेगवेगळ्या कारवाया किंवा व्हीआयपी व्यक्तींसाठी पोलिसांकडून विशेष सुरक्षेची मागणी केली जाते. यामध्ये खुद्द राज्य सरकार किंवा त्यांच्या इतर विभागांच्या कार्यक्रम वा कारवायांना ही सुरक्षा पुरवली जाते. यासाठी पोलीस दलाकडून निश्चित अशा मूल्याची मागणी केली जाते. शासनानं निर्धारित केलेल्या निकषांनुसारच हे दर आकारले जातात. मात्र, गेल्या ७ वर्षांत मुंबई पोलिसांनी पुरवलेल्या अशाच विशेष सुरक्षेसाठीचे तब्बल ७ कोटी रुपये थकित असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

१४ शासकीय यंत्रणा, ७ कोटींची थकबाकी!

माहिती अधिकारातून समोर आलेल्या माहितीनुसार, शासनाच्या एकूण १४ विभागांकडून या विशेष सुरक्षेसाठीचे तब्बल ७ कोटी १० लाख ६७ हजार २५२ रुपये थकित आहेत यामध्ये सर्वाधिक वाटा हा प्राप्तीकर विभागाचा असून त्यांच्या विविध ठिकाणी टाकण्यात आलेल्या छाप्यांसाठी ही विशेष सुरक्षा पुरवण्यात आली होती. त्याशिवाय या यादीमध्ये मुंबई मेट्रोपोलिटन डेव्हलपमेंट अथॉरिटी अर्थात MMRDA, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, फोर्टमधील जनरल स्टम्प ऑफिस अशा विविध शासकीय संस्थांचा समावेश आहे.

प्राप्तीकर विभाग, सर्वात मोठा 'डिफॉल्टर'!

करचुकवेगिरीमुळे इतरांना डिफॉल्टर घोषित करणारा प्राप्तीकर विभागत मुंबई पोलिसांचा सर्वात मोठा 'डिफॉल्टर' ठरला आहे. कारण थकित ७ कोटींच्या रकमेपैकी एकट्या प्राप्तीकर विभागाचेच ४ कोटी ८५ लाख रुपये थकित आहेत. गेल्या सहा वर्षांत प्राप्तीकर विभागानं टाकलेल्या वेगवेगळ्या छाप्यांसाठी पुरवलेल्या विशेष सुरक्षेचाही यात समावेश आहे. प्राप्तीकर विभागापाठोपाठ एमएमआरडीएकडे मुंबई पोलिसांचे १ कोटी ११ लाख रुपये थकित आहेत. २०१७ सालापासून या विभागाला पोलिसांनी पुरवलेल्या विशेष सुरक्षेचे हे पैसे आहेत. त्यानंतर आरबीआय तिसऱ्या क्रमांकावर असून RBI कडे मुंबई पोलिसांचे ४५ लाख ७१ हजार रुपये थकित आहेत.

एका वरीष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार या सर्व यंत्रणांना आधी विशेष सुरक्षेची मागणी करण्यासाठी मुंबई पोलीस आयुक्तांना विनंती अर्ज द्यावा लागतो. त्यानंतर ती विनंती पोलीस उपायुक्तांकडे पाठवली जाते. पोलीस आयुक्तांच्या वतीने नंतर पोलीस उपायुक्त त्या विनंती अर्जाची तपासणी करतात, चौकशी करतात आणि त्यातून आलेल्या निष्कर्षांच्या आधारे 'लोकल आर्म्स डिपार्टमेंट'ला संबंधित यंत्रणा वा व्यक्तींना सुरक्षा पुरवण्याचे आदेश दिले जातात.

"पोलीस उपायुक्त त्यांच्या आदेशांमध्ये आम्हाला तारीख, वेळ, ठिकाण आणि किती व्यक्ती सुरक्षेसाठी पाठवायच्या आहेत त्याची माहिती देतात. आम्ही फक्त त्यांचे आदेश पाळतो", अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका व्यक्तीसाठी १२ तास सुरक्षा पुरवण्याचे दर हे ५४८६ ते १३५६९ रुपयांदरम्यान असतात. किती व्यक्ती आणि कोणत्या पदावरील व्यक्ती सुरक्षेसाठी पुरवण्यात आल्या आहेत, त्यानुसार हे दर ठरतात. हे दर दरवर्षी बदलत असतात.

कांदिवली औद्योगिक वसाहतीचा 116 एकर भूखंड परत घेण्याचे आदेश, उच्च न्यायालयाकडून तूर्त अंतरिम स्थगिती

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

कांदिवली पश्चिम येथील चारकोप परिसरातील सुमारे ११६ एकर भूखंड कांदिवली औद्योगिक वसाहतीला ज्या प्रयोजनाऐवजी वितरित करण्यात आला होता त्याऐवजी व्यावसायिक वापर होत असून मूळ भूखंडांची परस्पर विक्री केल्यामुळे शासनाचा अनर्जित रक्कमेपोटी मोठा महसूल बुडाल्याचे निदर्शनास आल्याने अखेर राज्य शासनाने हा भूखंड परत घेण्याचे आदेश जारी केले आहेत. मात्र या आदेशाविरुद्ध कांदिवली सहकारी औद्योगिक वसाहत या संस्थेने उच्च न्यायालयात आव्हान दिले असून न्यायालयाने तूर्त या शासन निर्णयाला स्थगिती दिली आहे. आता या प्रकरणी ३ डिसेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

हा भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करताना त्यापैकी १६ भूखंड सार्वजनिक वापरासाठी तर उर्वरित दीडशे भूखंड औद्योगिक वापरासाठी वितरित करण्यात आले होते. यापैकी काही भूखंड प्रति चौरस मीटर फक्त ६६ रुपये दराने कब्जेहक्काने तर काही अटी-शर्तींच्या अधीन राहून प्रदान करण्यात आले. या भूखंडांचा औद्योगिक वापर वगळता बार, रेस्तराँ, कापड दुकाने, जिम, पब, खासगी वितरक, लॉज, कार शोरूम आदींसाठी वापर होत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते रेजी अब्राहम यांनी निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी तत्कालीन उपनगर जिल्हाधिकारी मिलिंद बोरीकर यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र लिहून या अनधिकृत वापराबद्दल कारवाई करण्यास सांगितले होते. परंतु त्यानंतरही काहीही झाले नव्हते. मात्र अब्राहम यांचा जिल्हाधिकारी कार्यालयाशी सतत पाठपुरावा सुरू होता.

या भूखंडाचा औद्योगिक वापर करण्याचा आदेश महसूल विभागाने १९६१ मध्ये जारी केला होता. मात्र या संपूर्ण प्रक्रियेवर प्राधिकृत अधिकारी म्हणून उपनगर जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. वितरणाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. त्यानंतर ही वसाहत उद्योग विभागाकडे हस्तांतरित करून व्यवस्थापन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सोपविण्यात आले होते. महामंडळाने कांदिवली सहकारी औद्योगिक संस्थेला अधिकार बहाल केले. या संस्थेने औद्योगिक वापर वगळता अन्य व्यावसायिक वापरासाठी परस्पर परवानगी दिली. यापोटी आकारण्यात आलेली अनर्जित रक्कमही संस्थेने वसूल केली. याबाबत उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करणे अपेक्षित असतानाही दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप अब्राहम यांनी केला. याबाबत असंख्य तक्रारी झाल्यांनतर आता महसूल विभागाने हा भूखंड उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात घेण्याचे आदेश ८ ऑक्टोबर रोजी जारी केला. या आदेशानुसार उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई सुरु केल्यानंतर संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली. आपली बाजू ऐकून घेतली नाही, असा दावा संस्थेने न्यायालयात केला. न्यायालयाने या प्रकरणी शासन निर्णयाला अंतरिम स्थगिती दिली आहे.

पैशांच्या वादातून भाजप कार्यकर्त्याचा खून

लोणावळा, दि. ४ : प्रतिनिधी

मावळातील पवनानगर परिसरात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्याचा खून प्रकरणाचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले. भाजप पदाधिकाऱ्याचा हातऊसने दिलेल्या पैशांच्या वादातून मित्राने साथीदारांच्या मदतीने दगडाने ठेचून खून केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी मित्रासह तिघांना अटक केली.

निलेश दत्तात्रय कडू (वय ३२, रा. सावंतवाडी, पवनानगर, ता. मावळ) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी अक्षय बाळू घायाळ (रा. सावंतवाडी, पवनानगर, ता. मावळ), पियूष विश्वनाथ डोंगरे, साहिल साईनाथ जाधव (दोघे रा. प्रभाचीवाडी, ता. मावळ) यांना अटक करण्यात आली. कडू भारतीय जनता पक्ष विद्यार्थी आघाडीचे पदाधिकारी होता आरोपी घायाळ आणि कडू मित्र आहेत. हातऊसने दिलेल्या पैशांमधून त्यांच्यात वाद झाले होते. कडू आणि घायाळ यांच्याविरुद्ध कामशेत आणि लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल झाले होते. ३१ ऑक्टोबर रोजी कडू आणि आरोपी घायाळ, डोंगरे, जाधव प्रभाची वाडी परिसरात रात्री दारु पित होते. हातऊसने दिलेल्या पैशांवरुन त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर आरोपींनी कडू याच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. त्याच्या डोक्यात दगड घालून खून केला.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तपास सुरू केला. हातऊसने दिलेल्या पैशांच्या वादातून घायाळने कडूचा खून केल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर त्याला तळेगाव दाभाडे परिसरातून पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदार डोंगरे, जाधव यांच्याशी संगनमत करुन खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी तिघांना अटक केली. पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अतिरिक्त अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी राजेंद्र मायने यांच्या मार्गदर्शनाखाली लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत आवारे, उपनिरीक्षक प्रकाश वाघमारे, विजय म्हात्रे यांनी ही कामगिरी केली.

दहावीच्या परीक्षा अर्जांसाठी मुदतवाढ

मुंबई, दि. ४ : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) फेब्रुवारी-मार्चमध्ये घेतल्या जाणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार ६ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे. राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. दहावीच्या नियमित विद्यार्थ्यांचे अर्ज सरल प्रणालीद्वारे ऑनलाइन पद्धतीने भरायचे आहेत. तर व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत आणि तुरळक विषय घेऊन परीक्षा देणारे विद्यार्थी, आयटीआयचे विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रचलित पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालयातर्फे भरायचे आहेत. त्यासाठी ५ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र आता अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला आहे. माध्यमिक शाळांनी अर्ज भरण्यापूर्वी शाळा, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची माहिती भरून मंडळाकडे पाठवणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज ऑनलाइन भरायचे असल्याने विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळेमार्फत अर्ज भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अर्जात भरलेली माहितीची पडताळणी करून ती अचूक असल्याची खात्री शाळांनी करावी. विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या आणि प्रीलिस्ट ४ डिसेंबरपर्यंत विभागीय मंडळाकडे जमा करायच्या असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi.auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: एम/एस. शिवानी ग्रो, शॉप क्र. १४, विहंग शांतीबन, रितू पार्क जवळ, ठाणे पश्चिम - ४००६०१.	
सह-कर्जदाराचे नाव: १. सौ. रुपाली मनोहर लोकले, ३८/९७३, निसर्ग सीएचएस, सिद्धार्थ नगर, एस व्ही रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई - ४००१०४. २. श्री. कमल मनोहर लोकले, ३८/९७३, निसर्ग सीएचएस, सिद्धार्थ नगर, एस व्ही रोड, गोरेगाव पश्चिम, मुंबई-४००१०४.	
वेळापत्रक: फ्लॅट क्र. २०२, दुसरा मजला, श्री अष्टविनायक दर्शन सीएचएसएल, टेकडी बंगलो रोड, चैतन्य अव्हेन्यू जवळ, पाचपाखाडी, ठाणे पश्चिम, पिन: ४०० ६०२.	
थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार)	रु. ९४,२५,९६६/- (रुपये चौऱ्याव लाख पंचवीस हजार नऊशे सहासष्ट फक्त)
लिलावाची तारीख	२० नोव्हेंबर २०२४
राखीव किंमत	रु. ६४,९१,६०९/- (रुपये चौसष्ट लाख एकण्णव हजार सहाशे नऊ फक्त)
बयाणा पैसे ठेव	राखीव किंमतीच्या १०%
किमान बोली वाढीची रक्कम	रु. १०,०००/-
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ	१२ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा
केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ.	१८ नोव्हेंबर २०२४ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह
ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ	२० नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान
टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.	

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०४ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : ठाणे अधिकृत स्वाक्षरी

ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) बीएल इंडिया फिटाउट प्रा. लिमिटेड (कर्जदार) गाला क्र. जी१९६, एक्सप्रेस झोन, बी विंग, पटेल वानिकाच्या पुढे, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव पूर्व, मुंबई-४०००६३	
सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. रामसूरत बाबुलाल विश्वकर्मा (सहकर्जदार) फ्लॅट क्र. ६०८, स्वप्नकिरण इमारत क्र २अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४००९७. (३) सौ. शारदादेवी रामसुरत विश्वकर्मा (सह-कर्जदार) फ्लॅट क्र. ६०८, स्वप्नकिरण इमारत क्र २अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७. (४) श्री. संदीपकुमार विश्वकर्मा (सह-कर्जदार) फ्लॅट क्र. ६०८, स्वप्नकिरण इमारत क्र २अ, राणी सती मार्ग, पिंपरी पाडा, स्वप्नलोक टॉवर समोर, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७	
वेळापत्रक- मालमत्तेचा पत्ता:- फ्लॅट क्रमांक १८०५, १८वा मजला, बी विंग, इमारत क्रमांक ०२, माऊली ओंकार, वैशेत पाडा, लक्ष्मण नगर रोड क्रमांक २, सीटीएस क्रमांक ७०१बी/१अ/१/१ (पीटी) आणि ७०१बी /१अ/१/१ ते ३० गाव मालाड, मालाड (पू), मुंबई ४०००९७.	
थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार)	रु. ५९,७७,७६४/- (रुपये एकोणसाठ लाख सत्त्यातर हजार सातशे चौसष्ट फक्त)
लिलावाची तारीख	५ डिसेंबर २०२४
राख